नागपूर येथे दि. २७ व २८ फेब्रुवारी २०१९ रोजी उष्णतेच्या लाटे (Heat Wave) बाबत आयोजित राष्ट्रीय कार्यशाळेसाठी प्राप्त केंद्र हिस्सा शासन खात्यात जमा करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक : आव्यप्र-२०१८/प्र.क्र.३००/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ०९.०५.२०१९

प्रस्तावना:-

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून आयोजित करण्यात येणा-या कार्यशाळेबाबत केंद्र शासनाचा हिस्सा म्हणून प्राप्त झालेले रू. ४ लक्ष निधी शासन खात्यात जमा करण्याची बाब विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शासन निर्णय क्रमांक आव्यप्र-२०१८/प्र.क्र.३००/आव्यप्र-१ दि. १६.०२.२०१९ अन्वये निगर्मित करण्यात आलेला शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येवून खालील सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या सहकार्याने उष्णतेच्या लाटेबाबतची राष्ट्रीय कार्यशाळा दि. २७ व २८ फेब्रुवारी २०१९ रोजी नागपूर येथे आयोजित करण्यात आली. त्या कार्यशाळेच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी जिल्हाधिकारी नागपूर यांच्यावर सोपविण्यात आली होती. या दोन दिवसांच्या कार्यशाळेसाठी विविध क्षेत्रातील ११२ प्रतिनिधी उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले असून त्या कामी झालेल्या एकूण खर्चाचा अहवाल जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेला आहे. त्यानुसार कार्यशाळा व निवास व्यवस्थाा व भोजन व्यवस्था यासाठीचा खर्च रू. ७,५२,४९९/- (रूपये सात लक्ष बावन्न हजार चारशे नव्यान्नव फक्त) वाहतूक व्यवस्थेसाठी खर्च रू. २,०८,९२३/- (रूपये दोन लक्ष आठ हजार नउशे तेवीस फक्त) तसेच इव्हेंट मॅनेजमेंटसाठी खर्च रू. २,८३,२००/- (रूपये दोन लक्ष त्रयाऐंशी हजार दोनशे फक्त) असा एकूण खर्च रू. १२,८९,००७/- (रूपये बारा लक्ष एकोणनव्वद हजार सात फक्त) खर्च झालेला आहे.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या सूचनेनूसार सदर कार्यशाळेच्या आयोजनासाठी होणा-या खर्चाच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ४ लक्ष निधी केंद्र शासनातर्फे देण्याबाबत नियोजित होते. दि. ३१ मार्च २०१९ रोजी सदर केंद्र हिस्स्याचा निधी राज्य आपत्ती सौम्यीकरण खात्यात (State Disaster Mitigation Fund) केंद्र शासनाने जमा केलेला आहे.

सदर निधी स्वतंत्र सौम्यीकरण खात्यातून काढून राज्य शासनाच्या खात्यात चलनाद्वारे जमा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन यांनी सदर निधी शासन खात्यात जमा करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharasghtra.gov.in या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०५०९१७०२४६१०१९ क्र. असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.05.09 17:05:28 +05'30'

(श्रीरंग घोलप)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) अपर मुख्य सचिव , वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
३) जिल्हाधिकारी, नागपूर.
४) महालेखापाल, महाराष्ट्र ½, मुंबई.
५) वित्तीय सल्लागार, सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
६) निवड नस्ती.